**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७१६/२०२५**
**जुना क्र. ३५९/२०१४**
**चंद्रकला वि. ज्ञानोबा**
**निशाणी क्रमांक १२५ खाली**

**प्रतिवादी क्र.४ तर्फे साक्षीदार क्रमांक १ बाबासाहेब ज्ञानोबा शिंदे यांचा शपथेवर पुढील सरतपास विधीज्ञ श्री. ए. बी. जगताप यांच्यामार्फत :-**

०२. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझा अंगठा आहे.

**वादीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एन. व्ही. सुर्यवंशी यांच्याकडून:-**

०३. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ९१ अनुसार या प्रकरणात माझा साक्षीपुरावा नोंदविण्यात आलेला आहे. साक्षीदार स्वतः सांगतो की, निशाणी क्र.९१ अनुसार नोंदविलेला पुरावा मी प्रतिवादी क्र.५ व ६ यांचेवतीने नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, शेतीशिवाय आमचे कुटूंबास उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दोन बहिणी आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी एक भाऊ बहिण आहे. वादी चंद्रकला ही माझी बहिण आहे, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दोन बहिणींना हिस्सा मिळू नये म्हणून मी सन १९९५ साली वादजमिनीचे प्रतिवादी क्र.५ व ६ चे नावे खरेदीखत केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादजमिन ही वडीलोपार्जित आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, काही मिळकती प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी खरेदी घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७१६/२०२५**
**जुना क्र. ३५९/२०१४**
**चंद्रकला वि. ज्ञानोबा**
**निशाणी क्रमांक १२५ खाली**

वडीलाचे मृत्यूपर्यंत आमचे एकत्र कुटूंब होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

प्रतिवादी क्र.३,५,६ यांचेवतीने साक्षीदाराचा उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.04.20 15:36:16 +0530

दिनांकः–२०/०४/२०२६

**(अ. अ. शेख)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | D. B. Nikam<br>Stenographer (Grade-II) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 20/04/2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 20/04/2026 |
| Order uploaded on | - | 20/04/2026 |